# जिप्सी राजकुमारी

लेखिका: फिबी गिल्मेन



# जिप्सी राजकुमारी

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन




कोणे एके काळी एक जिप्सी मुलगी होती. तिच्या मनात राजकुमारी बनण्याची तीव्र इच्छा होती. ती एका जिप्सी काफिल्यात राहात होती आणि तिचे नाव *सिनेमॉन* होते.

सिनेमॉनला अनेक गोष्टींचे ज्ञान होते. ती काचेच्या गोळ्यात बघून लोकांचे भविष्य सांगू शकत असे. जंगलात औषधी वनस्पती कुठे मिळतील, त्यांच्यापासून काढे-औषधे कशी बनवायची हे तिला ठाऊक होते. ती वाऱ्यासोबत बोलू शकत असे तसेच अस्वलासोबत नाचू शकत असे.







पण सिनेमॉनला स्वत:ला एका राजकुमारासोबत नाचायची इच्छा होती.

रात्री जेवणानंतर, ती शेकोटीसमोर बसून आपल्या वृद्ध मावशीकडून जादू, चेटूक, जलपऱ्या, चाचे आणि ड्रॅगन यांच्या थरारक गोष्टी ऐकत असे.

“अरेरे,” गोष्ट ऐकून सिनेमॉन उसासा टाकत म्हणे, “मलासुद्धा राजकुमारी सायप्रिनासारखं राजवाड्यात राहायला मिळालं असतं तर!”

“एक राजकुमारीसुद्धा दु:खी असू शकते,” वृद्ध मावशी उत्तरली.

“अशक्य,” जंगलात मिळालेला लाकडी तुकडा तासत सिनेमॉन म्हणाली.

लाकडातील एका जीवाची सिनेमॉनने सुटका केली, हे पाहून वृद्ध जिप्सी बाईला बरे वाटले. “सोन्याच्या मुकुटापेक्षा मौल्यवान गोष्टीही आहेत जगात!” ती म्हणाली.

सिनेमॉनला तिचे मत पटले नाही.






एके दिवशी राजकुमारी *सायप्रिना* तिचे भविष्य जाणून घेण्यास जिप्सी काफिल्यात आली. सिनेमॉनने काचेच्या गोळ्यात पाहिले आणि तिचे डोळे चमकले. “मला एक मोठ्ठा राजवाडा दिसतोय, एक सुंदर राजकुमार दिसतोय, हिरे-मोती-रत्ने दिसतायत....उज्ज्वल आहे तुझं भविष्य!

राजकुमारी सायप्रिना आनंदाने हसू लागली. आपला बटवा उघडून तिने एक चांदीचे नाणे सिनेमॉनच्या तळहातावर ठेवले. “जिप्सी मुली, तू अस्वलासोबत नाचतेस म्हणे. मला बघायला आवडेल.”

“मी प्रयत्न करेन,” सिनेमॉन म्हणाली, “पण *बाबालाझी*च्या मनात असेल तरच तो नाचतो.”







मग आपली डफली काढून सिनेमॉन एक जिप्सी गीत गाऊ लागली:

*बा-बा-लाझी, बाबालाझी,*

*येऊन इथे नाच*

*बा-बा-लाझी, बाबालाझी,*

*माझ्यासंगे नाच.*


बाबालाझी आला आणि नाचू लागला.

“गंमतच आहे!” राजकुमारी टाळ्या वाजवत म्हणाली. “तू तुझ्या अस्वलासोबत माझ्या राजवाड्यात चल. आपण एकत्र खेळू. मग मला कधी कंटाळा नाही येणार.”

बाबालाझीने डोके हलवले. त्याची इच्छा नव्हती जाण्याची.







पण सिनेमॉनने जराही संकोच केला नाही. तिने वृद्ध मावशीचा पापा घेतला, बाबालाझीचा आणि आपल्या जिप्सी आप्तांचा निरोप घेतला आणि ती शाही घोडागाडीत जाऊन बसली.

राजकुमारी सायप्रिनाने जाहीर केले, “या क्षणापासून तू राजकुमारी सिनेमॉन म्हणून ओळखली जाशील.”

आणि खरंच ती राजकुमारी म्हणून ओळखली जाऊ लागली.

राजवाड्यात दासींनी तिला सुगंधी पाण्याने आंघोळ घातली. त्यांनी तिचे काळेभोर केस विंचरून त्यांना सुवासिक तेल लावले. त्यांनी तिला मौल्यवान दागिन्यांनी मढलेले मुलायम कपडे घातले.

सिनेमॉनने राजवाड्यातील भव्य आरशात पाहिले तेव्हा ती स्वतःला ओळखूच शकली नाही.








सुरुवातीला दोघी राजकुमारी एकमेकांसोबत आनंदाने खेळल्या. राजकुमारी सिनेमॉन झुबकेदार शेपूट आणि निळेशार डोळे असलेल्या काळ्या अबलख घोड्यावर बसली. राजकुमारी सायप्रिनाने तिला आपली सुंदर सुंदर खेळणी दाखवली.

रोज सकाळी, राजवाड्याच्या दासी राजकुमारी सिनेमॉनचे केस विंचरत आणि त्यांना सुवासिक तेल लावत. रोज संध्याकाळी, राजवाड्याच्या भव्य नृत्यगृहात ती राजकुमारी सायप्रिनासोबत नाचत असे.

“मजा येतेय ना खूप?” नाचता नाचता राजकुमारी सायप्रिना म्हणत असे.

राजकुमारी घालतात ते उंच टाचेचे बूट घालून सिनेमॉन नाचत असे. ते बूट तिच्या पायांना टोचत असत आणि तिच्या पावलांना वेदना होत असत. यापेक्षा बाबालाझीसोबत नाचायला खूप मजा येते, असे तिला राजकुमारी सायप्रिनाला सांगावेसे वाटू लागले. पण तिला तशी संधीच मिळाली नाही. राजकुमारी सायप्रिना नाचताना गरगर फिरत दूर जात असे.







कित्येक दिवस, कित्येक आठवडे सरले. राजवाड्यातील सुंदर सुंदर खेळणी सिनेमॉनला आता सुंदर भासेनाशी झाली. कारण त्यांना चावी दिली की ते वारंवार एकाच पद्धतीची हालचाल करत असत.

“ड्रॅगन आणि जलपऱ्या नाहीत का इथे?” सिनेमॉनने एकदा विचारले.

राजकुमारी सायप्रिनाने आपल्या नाजूक पावलाने राजवाड्यातील संगमरवरी फरशीवर थाप दिली आणि म्हणाली, “असे बावळट प्रश्न विचारत जाऊ नकोस. ड्रॅगन, जलपऱ्या असं काही नसतं. चल, आता एक जिप्सी गाणं म्हण.”

पण राजकुमारी सिनेमॉनला गावेसे वाटत नव्हते. राजकुमारी सायप्रिनाला जिप्सी राजकुमारीचा कंटाळा आला. “ही खूप कंटाळवाणी आहे,” ती तक्रारीच्या सुरात आपल्या नव्या मैत्रिणींना सांगू लागली. ती म्हणाली त्यात तथ्यही होतं.







त्या रात्री, सिनेमॉन मऊशार शाही पलंगावर नुसतीच कूस बदलत पडून राहिली. “मला एकाकी वाटतंय, खूप एकाकी वाटतंय,” म्हणत ती रडू लागली.

बऱ्याच वेळाने झोप लागल्यावर तिला एक स्वप्न पडले. स्वप्नात तिची वृद्ध मावशी तिला शोधत होती.

“सिनेमॉन! सिनेमॉन! कुठायस तू बाळा?” “

सिनेमॉनने प्रतिसाद दिला, “मी हरवलेय.”

पुढल्या दिवशी सकाळी, ती रात्रीचे स्वप्न विसरून गेली. पावलांखाली थंडगार संगमरवरी फरशीऐवजी उबदार मातीचा स्पर्श अनुभवायला ती आतुर झाली होती. नाश्त्याच्यावेळी तिला तिचे आवडते ऑम्लेट खाण्याचीही इच्छा झाली नाही. तिने भोजनगृह सोडण्याची परवानगी मागितली.

राजकुमारी सायप्रिनाने अधीरपणे तिला निरोप दिला.









भोजनगृहातून बाहेर पडल्यावर सिनेमॉन राजवाड्याच्या विशाल प्रवेशद्वारावर आली. सावधपणे तिने द्वार उघडले आणि तिथून दूर नेणाऱ्या बाहेरच्या खडबडीत रस्त्यावर पाऊल ठेवले.

हवा तिच्या कानात कुजबुजली, “सिनेमॉन, सिनेमॉन.” तिला वाऱ्याचा पाठलाग करावास वाटला. पण उंच टाचेच्या बुटांमुळे तिला चालायला जमत नव्हते, म्हणून ती माघारी फिरली.

त्या रात्री, मऊशार शाही पलंगावर झोपल्यावर तिला पुन्हा वृद्ध मावशीचे स्वप्न पडले.


“कोण आहेस तू, बाळा?” मावशीने विचारले.

सिनेमॉन उत्तरली, “आठवत नाही मला.”

पुढल्या दिवशी सकाळी, सिनेमॉनला खूप बेचैन वाटू लागले. राजवाड्याच्या द्वाराचे गज तिला सोनेरी पिंजऱ्याच्या गजांसारखे भासू लागले.







विशाल प्रवेशद्वार उघडून तिने दूरवर नजर टाकली.

“सिनेमॉन, सिनेमॉन,” वारा कुजबुजला.

“वारा मला बोलावतोय,” ती म्हणाली. पायातील राजकुमारींचे नाजूक बूट काढून ती वाऱ्यामागे गेली आणि एक डोंगर ओलांडून एका मोठ्या जंगलानजिक पोहोचली.

पण तिला जंगलात प्रवेश करायचे धाडस झाले नाही. “आई गं, माझं डोकं खूप दुखतंय!” आपल्या सोन्याच्या मुकुटाला स्पर्श करत ती म्हणाली आणि माघारी वळली.

त्या रात्री, पुन्हा तिची वृद्ध मावशी तिच्या स्वप्नात आली.

“सोन्याच्या मुकुटापेक्षा मौल्यवान बऱ्याच वस्तू आहेत जगात!” वृद्ध जिप्सी म्हणाली.

सिनेमॉन जागी झाली. सभोवती कुणीच नव्हते, खिडकीबाहेर असलेल्या कारंज्याच्या पाण्यात तरंग उठवणाऱ्या वाऱ्याशिवाय!





पुढल्या दिवशी सकाळी सिनेमॉनने राजकुमारींचे उंच टाचेचे बूट घातले नाहीत. तिने डोक्यावर सोनेरी मुकुटसुद्धा ठेवला नाही. ती नाश्त्यासाठी आलिशान भोजनगृहातही गेली नाही. ती राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर गेली आणि द्वार उघडून वाऱ्याच्या मागेमागे चालू लागली.

जंगलाजवळ पोहोचल्यावर थांबून, मागे वळून ती सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या राजवाड्याकडे पाहू लागली.

तिच्या गालांना स्पर्श करत वारा कुजबुजला, “सिनेमॉन, सिनेमॉन.” मग सिनेमॉन गर्द जंगलात शिरली.

झुडपांमुळे आणि काट्यांमुळे तिचे कपडे फाटू लागले. पण यावेळी ती माघारी फिरली नाही. ती जंगलात खूप दूरपर्यंत गेली. दिवसभर चालल्यावर काळोख पडला आणि आभाळात तारे चमकू लागले. ती एका छोट्याशा तळ्याजवळ पोहोचली.







तिथे रानटी बोरे खाऊन तिने आराम केला. झाडाच्या पानांचा बिछाना करून ती त्यावर झोपी गेली. राजवाड्यातील मऊशार शाही पलंगावर लागली नाही, अशी गाढ झोप तिला लागली.

जागी झाली तेव्हा रोजच्यासारखं तिला राजवाड्याच्या सुंदर भिंती आणि सेवक दिसले नाहीत. त्याऐवजी, तिला सोनेरी सूर्यप्रकाश आणि तळ्याच्या थंडगार पाण्यात पोहोत असलेले एक अस्वल दिसले.

“बाबालाझी! बाबालाझी!” सिनेमॉन आनंदने ओरडू लागली.

बाबालाझी गोंधळून इथे-तिथे हुंगू लागला. आपल्या हरवलेल्या दोस्ताने हाक दिल्यागत त्याला वाटले. पण त्याने सिनेमॉनला ओळखले नाही.





“गुर्रर्रर!” तो गुरगुरला. मग वळून तो तळ्याच्या विरुद्ध किनाऱ्याकडे पोहत गेला आणि गर्द जंगलात नाहीसा झाला.

“मी ओळखू न येण्याइतपत बदललेय काय?” तळ्याच्या स्वच्छ पाण्यात आपले प्रतिबिंब निरखत सिनेमॉन विचार करू लागली. तिने तिच्या केसांना स्पर्श केला. सुवासिक तेल लावल्यामुळे ते कडक झाले होते.

“अरेरे!” नापसंती दर्शवत तिने पाण्यात उडी मारली. केसांतील सुगंधित तेलाचा सारा अंश निघून गेल्यावर ती प्रसन्न चेहऱ्याने पाण्यातून वर आली. “बाबालाझी मला ओळखू शकला नाही. पण मी स्वत:ला ओळखते ना!”

“मी आहे सिनेमॉन! एक जिप्सी मुलगी! मी वाऱ्याशी बोलू शकते आणि....





....आणि अस्वलाचा मागसुद्धा काढू शकते."

दिवसभर ती चालत राहिली. सूर्यास्त झाल्यावर, रात्री आभाळात चंद्र डोक्यावर आल्यावरही ती थांबली नाही. ती बाबालाझीचा माग काढत काढत चालत राहिली आणि शेवटी एकदाची जिप्सी लोकांच्या वस्तीत पोहोचली.


वस्तीजवळ जळणारी शेकोटी विझत चालली होती. ना कुणी सिनेमॉन आल्याचे पाहिले, ना कुणाला तिची चाहूल लागली, बाबालाझीशिवाय! हवेत इथे-तिथे हुंगत बाबालाझी गुरगुरला, "गुर्रर्रर!"


सिनेमॉन हळुवार गाऊ लागली:

*बा-बा-लाझी, बाबालाझी,*
*येऊन इथे नाच*
*बा-बा-लाझी, बाबालाझी,*
*माझ्यासंगे नाच.*









आणि मग ते रात्रभर नाच करत राहिले.

समाप्त